# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


जा.क्र./राआसो/पासुविक/५५१e३-४३१/२०२३
दिनांक- २४ / ०७ /२०२३

## परिपत्रक

विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मंजूर संस्थांच्या बांधकामाकरिता कंत्राटदारांचे पंजीकरण ( Empanelment of Contractors )करण्याकरिता मार्गदर्शक सूचना.

संदर्भ : – १) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. शाआबा -२०१६/प्र. क्र. ३/ बा.व्य.क/ दि. ०२/०६/२०२१.
२) ३८ व्या कार्यकारिणी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त दि. १९/०६/२०२३.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पायाभूत सुविधा विकास कक्ष मार्फत करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य अभियान व केंद्र सरकारच्या योजना अंतर्गत स्थापत्य व विद्युतविषयक विकास कामे पार पाडण्यासाठी, बांधकामाची प्रगती व गुणवत्ता राखणेकरिता कंत्राटदाराचे राष्ट्रीय आरोग्य अभियान विभाग अंतर्गत पंजीकरण (Empanelment of Contractors) करण्यास राज्य कार्यकारी समितीच्या ३८व्या बैठक समितीमध्ये मंजूरी मिळाली आहे. त्याअनुषंगाने कंत्राटदाराचे पात्रता व नोंदणी करणे सोयीचे होण्याच्या दृष्टीने सदर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) स्थापत्य कंत्राटदार वर्गवारी नोंदणी खालीलप्रमाणे :-

| अ क्र | कंत्राटदारांची वर्गवारी | काम करण्याची आर्थिक क्षमता | नोंदणीकरणास मंजूरी देण्यास सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | वर्ग १ अ | रु. ५० कोटीपेक्षा अधिक (अमर्याद) | कार्यकारी अध्यक्ष तथा प्रधान सचिव, सा.आ. विभाग |
| २ | वर्ग १ ब | रु. १५ कोटीपेक्षा अधिक ते रु. ५०.०० कोटी पर्यंत | आयुक्त रा.आ.अ. विभाग |
| ३ | वर्ग १ क | रु. ७.५० कोटीपेक्षा अधिक ते रु. १५.०० कोटी पर्यंत | आयुक्त रा.आ.अ. विभाग |
| ४ | वर्ग २ | रु. ७.५० कोटी पर्यंत | आयुक्त रा.आ.अ. विभाग |

| अ क्र | कंत्राटदारांची वर्गवारी | काम करण्याची आर्थिक क्षमता | नोंदणीकरणास मंजूरी देण्यास सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| ५ | वर्ग ३ | रु. ३.००कोटी पर्यंत | अधीक्षक अभियंता, राआअ., पायाभूत सुविधा विकास कक्ष |
| ६ | वर्ग ४ | रु. १.५० कोटी पर्यंत | अधीक्षक अभियंता, राआअ., पायाभूत सुविधा विकास कक्ष |
| ७ | वर्ग ४ अ | रु. ९०.०० लक्ष पर्यंत | अधीक्षक अभियंता, राआअ., पायाभूत सुविधा विकास कक्ष |
| ८ | वर्ग ५ | रु. ५०.०० लक्ष पर्यंत | अधीक्षक अभियंता, राआअ., पायाभूत सुविधा विकास कक्ष |

२) विद्युत कंत्राटदार वर्गवारी नोंदणी खालीलप्रमणे -:

| अ क्र | कंत्राटदारांची **वर्गवारी** | **काम करण्याची आर्थिक क्षमता** | नोंदणीकरणास **मंजूरी** देण्यास सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | वर्ग अ | अमर्याद | आयुक्त, रा.आ.अ. विभाग |
| २ | वर्ग ब | रु २५.०० .लक्ष पर्यंत | अधीक्षक अभियंता, राआअ., पायाभूत सुविधा विकास कक्ष |
| ३ | वर्ग क | रु ७.५ .लक्ष पर्यंत | अधीक्षक अभियंता, राआअ., पायाभूत सुविधा विकास कक्ष |

कंत्राटदाराचे कागदपत्रे यांची छाननी करणेकरिता खालीलप्रमाणे वर्गवारी निहाय समिती गठित करण्यात आलेली आहे .

वर्ग ५- ( रु. ५० लक्ष पर्यंत) ते वर्ग-३ (रु. ३ कोटी पर्यंत) ह्या वर्गावरीतील कंत्राटदाराचे पंजीकरण करणेसाठी छाननी समिती

| **अ क्र** | **पदनाम** | **कार्यकारणी** |
|---|---|---|
| १ | सहसंचालक, अर्थ व प्रशासन, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | राज्य वित्त व्यवस्थापक, राआअ, मुंबई | सदस्य |
| ३ | अधीक्षक अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राआअ, मुंबई | सदस्य |
| ४ | कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राआअ, मुंबई | सदस्य सचिव |

वर्ग -२ (रु. ७.५ कोटी) ते वर्ग १ (रु. ५० कोटी पर्यंत) ह्या वर्गवारीतील कंत्राटदाराचे पंजीकरण करणेसाठी छाननी समिती

| अ क्र | पदनाम | कार्यकारणी |
|---|---|---|
| १ | संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | अध्यक्ष |
| २ | सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| ३ | सहसंचालक, अर्थ व प्रशासन, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई | सदस्य |
| ४ | अधीक्षक अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राआअ, मुंबई | सदस्य |
| ५ | कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राआअ, मुंबई | सदस्य सचिव |

२. उपरोक्त वर्गवारीनुसार कंत्राटदारांच्या नोंदणीकरणाची संपुर्ण प्रक्रिया परिशिष्ट -१ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच पार पाडणे आवश्यक राहील.

३. कंत्राटदारांनी सादर केलेल्या अद्ययावत आयकर निपटारा प्रमाणपत्रातील गेल्या तीन ते पाच वर्षातील निम्न/लघुत्तम उलाढालीच्या ४.५ पट किंवा कमाल/महत्तम उलाढालीच्या तीन पट यापैकी जी अधिक असेल ती रक्कम परिशिष्ट -१ मधीक उपवर्गीकरणासाठी विचारात घेण्यात यावी.

४. कंत्राटदाराच्या वर्ग १ अ ते वर्ग ५ या वर्गातील नोंदणी प्रस्तावासोबतच्या कागदपत्रांची छाननी/पडताळणी करताना खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

अ) कंत्राटदराने कार्यकारी अभियंत्याकडे नोंदणीसाठी प्रस्ताव दाखल केल्यानंतर प्रस्तावासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या /कागदपत्राच्या सत्यतेबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांनी सदर प्रमाणपत्रे/कागदपत्रे ज्या कार्यालयाने/ प्राधिकरणाने दिली आहेत, त्या कार्यालयाकडून संपर्क साधून करावी.

आ) कंत्राटदारांनी सादर केलेल्या प्रस्तावातील मूल प्रमाणपत्रांच्या /कागदपत्रांच्या सत्यतेबाबत खातरजमा केल्यानंतर नोंदणी प्रस्ताव सोबत शासनास सादर करावयाच्या विविध प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या सत्यप्रती ज्या विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो, त्या विभागाच्या कार्यकारी अभियंता /उपअभियंता यांनी त्यांचे स्वाक्षरीनेच साक्षंकीत कराव्यात, अन्यथा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही.

इ) कंत्राटदाराने खाजगी कामे केल्याबाबतची प्रमाणपत्रे प्रस्तावासोबत सादर केली असल्यास, सदर कामे त्या कंत्राटदारानेच केली आहेत याची शहानिशा संबधित कार्यकारी अभियंता यांनी करावी. तसेच केलेल्या कामाच्या किमतीबाबत खातरजमा करावी. खाजगी कामांची माहिती शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात सादर करावी. अर्जदाराने सदर खाजगी कामे करण्याबाबत संबधित खाजगी व्यक्तीशी केलेले करारनामे बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकाची प्रत सदर खाजगी कामांच्या नकाशास/प्रस्तावास मंजुरीबाबतचे महापालिका/नगरपालिका/ग्रामपंचायत/ महसूल विभागाचे मंजुरीचे आदेश, सदर खाजगी कामाबाबत अर्जदारास प्राप्त रकमेबाबतची कागदपत्रे व सदर खाजगी कमपसून प्राप्त उत्पन्न त्या त्या आर्थिक वर्षातील आयकर परताव्यात दर्शविल्याबाबतची सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र/ अहवाल यांची तपासणी करण्यात यावी.

ई) काही प्रकरणी साखर कारखाना/सूट गिरणी यांच्या कामांचे दाखले सादर करण्यात येतात. अशा प्रकरणी साखर आयुक्त/ संचालक हातमाग व वस्त्रोद्योग, नागपुर यांच्याकडून किंवा त्यांचे कार्यालयातील सक्षम अधिकाऱ्याकडून सदरील कामांचे दाखले प्रतीस्वाक्षरीत असणे आवश्यक आहे.

उ) सक्षम अधिकाऱ्यांकडे नोंदणी प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावयाच्या प्रस्तावासोबत "प्रमाणित करण्यात येते की, मे/श्री ____________________या वर्ग ______मधील कंत्राटदार नोंदणीच्या प्रस्तावांत असलेल्या सर्व कागदपत्रांच्या /प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत संबधित कार्यालयाशी संपर्क साधून खातरजमा करण्यात आली आहे" असे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मंडळ स्तर, यांनी देणे अनिवार्य आहे.

ऊ) कार्यकारी अभियंता यांनी कंत्राटदार नोंदणीबाबतच्या प्रस्तावाची सखोल छाननी करून वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावातील विविध प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबतची खातरजमा करूनच आवश्यक अटीची/निकषांची पूर्तता होत असलेले प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्यांकडे मंजूरीसाठी सादर करावेत.

ऋ) स्थापत्य नोंदणी वर्ग ३ ते ५ तसेच विद्युत नोंदणी वर्ग ब व क यांचे नोंदणी प्रमाणपत्र हे अधीक्षक अभियंता यांनी देण्यात यावे तसेच वर्ग १ ते वर्ग २ (स्थापत्य) व विद्युत वर्ग अ यांचे नोंदणी प्रमाणपत्र हे आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या स्तरावर देण्यात यावे.

५. कार्यकारी अभियंत्याकडून प्राप्त झालेल्या कंत्राटदार नोंदणी प्रस्तावातील प्रमाणपत्रे खोटी असल्याचे नंतर निदर्शनास आल्यास संबधित कंत्राटदारांची नोंदणी रद्द करण्यात येईल. व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच प्रस्तावातील कागदपत्रांची छाननी/पडताळणी/खातरजमा करण्याबाबतची

दक्षता न घेतल्याबाबत ज्या कार्यलयातून सदर प्रस्ताव सादर करण्यात येईल, त्या संबधित कार्यकरी अभियंता यांचेवर व त्या कार्यालयतील इतर संबधितांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

६. यापूर्वी कंत्राटदाराने राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कामे विहित वेळेत व गुणवत्तापूर्वक केलेली असतील त्यांना नोंदणीसाठी प्राधान्य देण्यात यावे.

७. जर एखाद्या कंत्राटदाराकडे शासनाची वसूली निघाली तर ती त्या कंत्राटदाराच्या महाराष्ट्रातल्या कोणत्याही कामातून वसूल करण्याचा व कंत्राटदारावर कारवाई करण्याचा हक्क शासनाकडे नोंदणीकरणास मंजूरी देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडे (Registration Sanctioning Authority) राहील.

८. कंत्राटदाराने सादर केलेली कागदपत्रे खरी असून त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र कंत्राटदाराकडून करून घेण्यात यावे. कागदपत्रे खोट अथवा बनावट आढळल्यास कंत्राटदारावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

९. सदर परिपत्रक राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या **http://arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

धीरज कुमार (भा.प्र.से.)
आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान,
महाराष्ट्र, मुंबई

प्रती,

१) मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई
२) मा. प्रधान सचिव ,सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई
३) मा. प्रधान सचिव ,नगररचना विभाग, मंत्रालय मुंबई
४) मा. प्रधान सचिव ,ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई
५) संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई
६) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (सर्व)
७) अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
८) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ (सर्व)
९) सहसंचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई
१०) सहसंचालक (तांत्रिक/अतांत्रिक/अर्थ व वित्त), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२) उपसंचालक , आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व)
१३) जिल्हास्तरीय मुख्यालयीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (सर्व)

१४) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)

१५) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१६) विभागीय कार्यकारी अभियंता , आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व)

१७) उपअभियंता, पासूविक, जिल्हा परिषद (सर्व)

१८) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परिषद (सर्व)

१९) जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद (सर्व)

निरोगी गाव, निरोगी देश